MHBI100003182013

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :- | १८.०२.२०१३ |
| नोंदणी तारीख | :- | १८.०२.२०१३ |
| निकाल तारीख | :- | ११.०५.२०२६ |
| कालावधी | :- | १३ वर्षे ०२ महिने २३ दिवस |

**भाग अ***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१) ]**

| केज येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, केज यांचे न्यायालयात<br>( पिठासीन अधिकारी : पी.व्ही. चव्हाण ) | |
|---|---|
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. -२०९/२०१२<br>केज पोलिस स्टेशन |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०५.२०२६ निशाणी क्र.२६६/ब |
| प्रकरण क्रमांक<br>तक्रारकर्ता/ अभियोग पक्ष | नियमीत फौजदारी प्रकरण क्रमांक ९५/२०१३<br>महाराष्ट्र शासन मार्फत/ व्दारा ठाणे अंमलदार, केज पोलिस स्टेशन, (फिर्यादी-वर्षा रावसाहेब धस) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री.ओ.पी.लोमटे (सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता ) |
| आरोपी | १. रावसाहेब भिमराव धस,<br>वय – २८ वर्षे, धंदा- नोकरी,<br><br>२. भिमराव मारोती धस (मयत),<br>वय – ५९ वर्षे,<br><br>३. दादाहारी मारोती धस,<br>वय – ५४ वर्षे, धंदा-नोकरी,<br><br>४. आंतरकला भिमराव धस,<br>वय – ५४ वर्षे, धंदा-घरकाम,<br>आरोपी क्र.१ ते ४ रा. शिक्षक कॉलनी, केज ता.केज, जि.बीड.<br><br>५. आशा बालाजी बिक्कड,<br>वय – २४ वर्षे, धंदा-घरकाम,<br><br>६. बाबासाहेब पांडुरंग चोले,<br>वय – ३२ वर्षे, धंदा-नोकरी, |

| | |
|---|---|
| | ७. बालाजी बन्सी बिक्कड,<br>वय – २६ वर्षे, धंदा-नोकरी,<br>आरोपी क्र.५ व ७ रा.नाव्होली,<br>ता.केज, जि.बीड.<br><br>८. उषा बाबासाहेब चोले,<br>वय – २८ वर्षे, धंदा-नोकरी,<br>आरोपी क्र. ६ व ८ रा.खडकी,<br>ता. वडवणी, जि.बीड. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री. जे.डी.चाळक, (बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब ***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२) ]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २३.१०.२०१२ |
| पहिल्या खबरीची तारीख | २३.१०.२०१२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ३१.०१.२०१३ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | २७.०१.२०१४ |
| पुराव्याला सुरवात झाल्याची तारीख | २५.०३.२०१४ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | --------- |

**आरोपींबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>३.<br>४. | रावसाहेब भिमराव धस,<br>दादाहारी मारोती धस,<br>आंतरकला भिमराव | आरोपी क्र.१, ३ ते ५ २५.१०.२०१२ | -- | भा.द.वि. चे कलम ४९८(अ), ३२३ व ५०४ सह कलम ३४ | निर्दोषमुक्त | --- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| <br>५.<br><br>६.<br><br>७.<br><br>८. | धस,<br>आशा बालाजी बिक्कड,<br>बाबासाहेब पांडुरंग चोले,<br>बालाजी बन्सी बिक्कड,<br>उषा बाबासाहेब चोले, | आरोपी क्र. ६ ते ८ ३०.११.२०१२ | | अन्वये | | | |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | फौजदारी प्रक्रिया संहिता |
| भारतीय दंड विधान, १८६० | भारतीय दंड विधान |

**भाग क ***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३) ]**

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्षः</u>**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | वर्षा रावसाहेब धस (निशाणी क्र.५५) | फिर्यादी |
| सा.क्र.२ | शशिकला निवृत्ती फड (निशाणी क्र.१५१) | साक्षीदार |
| सा.क्र.३ | रशिद बशिरखान पठाण (निशाणी क्र.२२६) | तपासी अधिकारी |

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्षः</u>**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ५६ | फिर्याद |

**ड. महत्वाच्या वस्तुः**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | -- | -- |

## <u>न्यायनिर्णय</u>

**<u>( दिनांक ११ मे २०२६ रोजी घोषीत )</u>**

आरोपींविरुध्द प्रस्तुतचा खटला भारतीय दंड विधान चे कलम ४९८(अ),३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या

गुन्हयासाठी चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे :**

०२. तक्रारदार नामे वर्षा रावसाहेब धस हिचा विवाह आरोपी क्र.१ सोबत दिनांक १८.१२.२०११ रोजी वरवरी येथे हिंदु रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झालेनंतर आरोपींनी फिर्यादीस चार महिने चांगले नांदविले. त्यानंतर फिर्यादीचा नवरा, सासु, सासरे व ननंद हे तु दिसायला चांगली नाहीस, तु आम्हास पसंद नाहीस व प्लॉटचे बांधकाम व चार चाकी गाडी घेण्यासाठी तुझ्या आई वडिलांकडुन १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये) घेवुन ये अशी मागणी करुन मारहाण व शिवीगाळ करुन उपाशीपोटी ठेवुन शारिरीक व मानसिक त्रास देवु लागले. फिर्यादीचे वडिल हे एम.एस.इ.बी. मध्ये औरंगाबाद येथे नोकरी करत होते व ते मयत झाल्याने फिर्यादीची आई व भाउ यांच्याकडे सासरच्या लोकांना देण्याकरिता ऐवढी रक्कम नव्हती ही गोष्ट फिर्यादीच्या आई व भाउ यांनी सासरच्या लोकांना समजावुन सांगितली. परंतु, त्यांनी ऐकले नाही व सदर मागणी पुर्ण करत नाही म्हणुन आरोपी क्र.१ ते ८ यांनी फिर्यादीला शिवीगाळ व मारहाण करुन पैशाची मागणी केली व दि. २६.०३.२०१२ रोजी शिक्षक कॉलनी, केज येथुन घराच्या बाहेर हाकलुन दिले म्हणुन फिर्यादी तिच्या माहेरी गेली. त्यानंतर फिर्यादीने महिला तक्रार निवारण केंद्र केज येथे कार्यवाही केली परंतु तिच्या सासरच्या लोकांनी तिला नांदवण्यासाठी घेवुन गेले नाही म्हणून फिर्यादीने आरोपींविरुध्द केज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

०३. फिर्यादीने दाखल केलेल्या वर नमूद फिर्यादीनुषंगे केज पोलिसांनी गु.र.नं.२०९/२०१२ नोंदवून पुढील तपासकाम पोलिस नाईक श्री.आर.बी.पठाण यांच्याकडे सुपूर्त केला. तपासादरम्यांन तपास अधिका-याने साक्षीदारांचे जबाब नोंदविले, कागदोपत्री पुरावा गोळा केला आणि तपासाअंती सबळ पुरावा मिळून आल्यामुळे आरोपीतांविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ), ३२३, ५०४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. दोषारोप दाखल झाल्यानंतर प्रस्तुत गुन्हयातील आरोपी क्र.२ नामे भिमराव मारोती धस हे दिनांक ०८.०५.२०१३ रोजी मयत असल्याबाबत अभियोग पक्षाने निशाणी क्र.४९ अन्वये मृत्युप्रमाणपत्र दाखल केल्यानुसार आरोपी क्र.२ भिमराव मारोती धस यांचे विरुध्द प्रकरण उपशमित करण्यात आले. आरोपी क्र.१, ३ ते ८ हे न्यायालयापुढे हजर झाल्यानंतर निशाणी क्र.५३ वर त्यांच्याविरुध्द भारतीय दंड विधान, कलम ४९८-अ, ५०४ सह कलम ३४

अन्वये दोषारोप निश्चित केला. सदरचा दोषारोप त्यांना वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी गुन्हा नाकबूल केल्यामुळे प्रस्तुतच्या खटल्याची संपरीक्षा पुढे चालविण्यात आली.

०५. अभिलेखाचे व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तक्रारदार हिचा पुरावा दिनांक २५.०३.२०१४ रोजी तहकुब करण्यात आला व त्यानंतर दिनांक १६.०४.२०१६ रोजी म्हणजेच जवळपास दोन वर्षानंतर पुर्ण झाला. त्यानंतर साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा दिनांक ०१.०९.२०१८ रोजी सुरु झाला व दिनांक २६.११.२०१९ रोजी पुर्ण झाला. साक्षीदार यांना वारंवार समन्स/वारंट काढुन देखील अभियोग पक्षाने साक्षीदारास हजर केले नाही त्यामुळे उर्वरीत साक्षीदार अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले नाहीत. तसेच प्रकरण जुने असल्याने दिनांक २६.०६.२०१९ रोजी पुर्व पिठासिन अधिकारी यांनी निशाणी क्र.१ कडे आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपी क्र.१, ३ ते ८ विरुध्द गुन्हयात सहभाग दर्शविणारा पुरावा आल्यामुळे त्यांचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र.१७३ ते १७९ अन्वयेचे नोंदविण्यात आले .

०६. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८अ, ३२३ व ५०४ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केलेले असून आरोपींवर केवळ ४९८अ व ५०४ या कलमाखाली दोषारोप निश्चित करण्यात आलेले आहे. परंतु अभिलेखाचे व पुराव्याचे अवलोकन केले असता कलम ३२३ प्रमाणे देखील दोषारोप ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आरोपींना दोषारोप वाचून दाखविले व तो त्यांनी नाकबुल केला. याकामी आलेला पुरावा व आरोपी क्र. १, ३ ते ८ यांचे विरुध्द निश्चित करण्यात आलेला दोषारोप यांचा विचार करता, खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २३.१०.२०१२ तथा लग्नानंतर चार महिन्याच्या कालावधीत अथवा त्यानंतर आरोपी क्र.१, ३ ते ८ यांनी मयत आरोपी क्र.२ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी नामे वर्षा रावसाहेब धस हिस घर बांधकामासाठी व चारचाकी | नाही |

| | | |
|---|---|---|
| | वाहन खरेदी करण्यासाठी रक्कम १५,००,०००/- रुपये माहेरुन आणण्याच्या मागणी पुर्ततेसाठी व इतर कारणांसाठी फिर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ करुन तिला क्रूर वागणूक दिल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| २. | उपरोक्त तारखेस वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस संगनमताने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्यायोगे भारतीय दंड विधान संहिता कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ३. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीचा उददेशपुर्वक अपमान करुन त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्यांचेकडुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उदयुक्त केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ साठी :-**

०७. मुद्दा क्रमांक १ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे वारंवारता टाळण्यासाठी व सोयीचे व्हावे म्हणुन एकत्रीत चर्चेस घेतले आहेत. अभियोग पक्षाने भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ) प्रमाणे गुन्हा सिध्द करण्याकरीता प्रथम आरोपींकडुन फिर्यादीकडे मालमत्ते बेकायदेशिर मागणी करण्यात आली, हे सिध्द करणे आवश्यक आहे. त्यानंतर, ती मागणी पुर्ण करण्याकरीता त्यांनी तक्रारदार हिचा मानसिक व शारिरीक त्रास देवुन छळ केला, हे सिध्द करणे आवश्यक आहे.

०८. अभियोग पक्षाने भा.द.वि. कलम ३२३ प्रमाणे गुन्हा सिध्द करण्याकरिता सर्वप्रथम फिर्यादीस दुखापत झाली होती व त्यानंतर ती दुखापत इच्छापुर्वक करण्यात आली हे सिध्द करणे आवश्यक आहे.

०९. अभियोग पक्षाने भा.दं.वि कलम ५०४ प्रमाणे गुन्हा सिध्द करण्याकरीता सर्वप्रथम तक्रारदार हिचा उद्देशपुर्वक अपमान करण्यात आला, हे सिध्द करणे

आवश्यक आहे. त्यानंतर तो आपमान करण्यामागे तक्रारदार यांनी सार्वजनिक शांततेचा भंग करावा यासाठी त्यांना प्रक्षोभित करण्याचा उद्देश आरोपींचा होता, हे सिध्द करणे गरजेचे आहे. या मुद्दयांचा विचार करता, अभियोग पक्षाने दिलेल्या पुराव्याचा विचार करणे आवश्यक आहे.

१०. सर्वप्रथम या प्रकरणातील मान्य वस्तुस्थिती नमुद करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे तक्रारदार व आरोपी क्र.१ यांच्यातील पती-पत्नीचे नाते ही मान्य वस्तुस्थीती आहे. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ वर्षा धस यांनी त्यांचे सरतपासाणीमध्ये असे कथन केले आहे की, लग्नानंतर चार महिने आरोपींनी त्यांना चांगले नांदविले. त्यानंतर तक्रारदार दिसायला चांगली नाही, ती आरोपी यांना पसंत नाही म्हणुन सर्व आरोपींनी तिला त्रास देण्यास सुरुवात केली. पुढे तिने असे कथन केले आहे की, प्लॉटवर घर बांधण्यासाठी व चारचाकी गाडी घेण्यासाठी आरोपी तिचेकडे पंधरा लाख रुपयांची मागणी करत होते. आरोपींनी तक्रारदार हिला बारीक-बारीक गोष्टीवरुन त्रास दिला व उपाशी ठेवले. तिने तिची आई व भाऊ यांना तिला होणा-या त्रासाबाबत सांगितले. तक्रारदार हिच्या माहेरकडील लोकांनी ते पैसे देवु शकत नाही, असे सांगितल्यानंतर आरोपींनी तिला २६ एप्रिल रोजी मारहाण करुन घराबाहेर काढले. पुढे साक्षीदाराने असे कथन केले आहे की, चार-पाच महिने वाट पाहिल्यानंतर दिनांक ११.०७.२०१२ रोजी तक्रारदार हिची आई तिला नांदण्यासाठी सासरी घेवुन आली असता, आरोपींनी तक्रारदार व तिचे आईस मारहाण केली. म्हणुन तिने आरोपींविरुध्द अदखलपात्र गुन्हा नोंदवला. त्यानंतर तक्रारदार ही तिच्या आईसोबत माहेरी आली. त्यानंतर आरोपींनी तिला नांदण्यास येण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे ती नांदण्यास गेली परंतु, तरीदेखील आरोपींनी तिला नांदवले नाही म्हणुन तिने महिला तक्रार निवारण केंद्र येथे तक्रार दाखल केली. त्यानंतर तिने सदरची फिर्याद दाखल केली. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याने निशाणी क्र.५६ प्रमाणे पहिली खबर आवश्यक तो तोंडी पुरावा देवुन सिध्द केली आहे.

११. सदर साक्षीदाराच्या उलटतपासणीमध्ये तिने आरोपी चार ते पाच महिने नांदण्यास नेतील म्हणुन वाट पाहिली व त्यानंतर आरोपींविरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल केला. तिने पुढे असे कथन केले आहे की, पोलीसांनी तिची फिर्याद नोंदवुन घेतली नसल्यामुळे तिने महिला तक्रार निवारण केंद्र येथे गेल्याचे पोलीसांना सांगितले होते, परंतु पोलीसांनी तसे का नोंदवुन घेतले नाही, याचे कारण ती सांगु शकत नाही. पुढे तिने असे कबुल केले आहे की, लग्नापुर्वी आरोपींची चौकशी केली होती. तिचे पतीचे नांवे गांवकडे पाच ते सहा एकर जमीन

आहे व तो करमाळा येथे विज खात्यात ऑपरेटर म्हणुन नोकरीस आहे. लग्नाचेवेळेपासुन आरोपी क्र.१ हे बाहेरगांवी राहतात. केज येथे तिचे सास-यांनी बांधलेले आर.सी.सी. घर आहे व घरालगत एक रिकामा प्लॉट आहे. तसेच आरोपीकडे एक मोटार सायकल आहे. साक्षीदाराने तिचे उलटतपासात पुढे असे कथन केले आहे की, तिच्या पतीला दोन बहिणी असुन त्यांचे लग्न तिच्या लग्नापुर्वीच झाले आहेत. तसेच तिची एक नणंद वडवणी तालुक्यात शिक्षीका म्हणुन नोकरीस आहे व दुसरी नणंद केज येथील नाव्होली येथे दिली असुन तिचे पती एस.टी. खात्यामध्ये नोकरीस आहेत. आरोपी क्र.३ हे तिच्या सास-याचे भाऊ आहेत व ते तिचे सास-यापासुन चार वर्षापुर्वी विभक्त झाले आहेत. लग्नानंतर चार महिने आरोपींनी तक्रारदार हिला चांगले नांदवले. त्या काळात तिचे पती कोल्हापुर येथे नोकरीस होते. मधल्या काळात पंधरा दिवस ती तिचे पतीसोबत कोल्हापुर येथे राहिली.

१२. साक्षीदाराने उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, शेजारच्यांना तिने आरोपी त्रास देत असल्याचे सांगितले नाही. तसेच तिने तिची बहिण व पती यांना देखील त्रासाबाबत सांगितले नाही. तिच्या पहिल्या लग्नाची तारीख तिला आठवत नाही. तिच्या पहिल्या पतीचे नांव हनुमंत आण्णासाहेब ढाकणे होते. तक्रारदार व तिची बहिण सोनाली यांचा विवाह पुर्वी एकाच घरात झाला होता.

१३. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ शशिकला यांनी त्यांचे सरतपासात मध्ये असे कथन केले आहे की, आरोपी क्र.१ व ३ ते ८ हे अनुक्रमे तिचे पती, चुलत सासरे, सासु, नणंदा व नंदावे आहेत. वर्षा हिच्या लग्नाचा सर्व खर्च शशिकला यांनी सर्व मानपान व संसारउपयोगी वस्तु देवुन केला. लग्नानंतर चार महिने आरोपींनी तिला व्यवस्थीत नांदवले. त्यानंतर त्यांनी तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला. ते तिला म्हणत होते की, ती दिसायला चांगली नाही व ती त्यांना पसंत नाही. त्यांनी तिला उपाशीपोटी ठेवुन मारहाण केली व तिचेकडे प्लॉटचे बांधकाम करण्यासाठी व चारचाकी गाडी घेण्यासाठी पंधरा लाख रुपयांची मागणी केली. सदरची बाब वर्षाने त्यांना फोनवर सांगितली. त्यानंतर सदरची रक्कम त्यांना देणे जमणार नाही असे सांगितल्यानंतर सन-२०१२ मध्ये वर्षा हिला त्यांनी शिवीगाळ व मारहाण करुन घराबाहेर काढले. त्यानंतर त्यांची मुलगी औरंगाबाद येथे आली. त्यानंतर त्यांनी आरोपींना समजावुन सांगुन देखील त्यांनी वर्षा हिला नांदविण्यास नकार दिला. त्यानंतर आरोपींकडुन वर्षाला नांदण्यास पाठवा म्हणुन नोटीस आली. त्याप्रमाणे वर्षा हिला नांदण्यास घेवून गेले असता, आरोपींनी तिला ठेवुन घेतले नाही. त्यानंतर वर्षाने महिला तक्रार निवारण केंद्र, केज येथे तक्रार

दाखल केली. परंतु, तेथुन देखील तिला नांदावयास नेले नाही. त्यानंतर वर्षाने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

१४. सदर साक्षीदाराचे उलटतपासा दरम्यान तिने असे कबुल केले आहे की, पोलीसांना जबाब देताना तीने आरोपींना पुन्हा सांगितले त्यांनी तिचे ऐकले नाही व तिच्या मुलीने नांदविण्यास नकार दिला, तिच्या मुलीला नांदवण्याकरीता पाठवण्या संदर्भात नोटीस आली होती. त्यानंतरही ती मुलीला घेवुन त्यांच्या घरी गेली परंतु, त्यांनी तिच्या मुलीला ठेवुन घेतले नाही, या बाबी पोलीसांना सांगितल्या होत्या, परंतु त्या तिचे जबाबात का आल्या नाहीत, याचे कारण ती सांगु शकत नाही.

१५. पुढे साक्षीदार असे कथन केले आहे की, तिने पोलीसांत जबाब देतांना दिनांक २६.०३.२०१२ रोजी आरोपींनी संगणमत करुन तिला घरातुन हाकलुन दिले होते. आरोपी क्र.१ याचे स्थळ तिचे मोठे जावई शामराव ठोंबरे यांनी सुचविले. लग्नापुर्वी आरोपींची आर्थीक परिस्थीतीची चौकशी करुन लग्न ठरविले होते. फिर्यादी वर्षाच्या लग्नापुर्वी रावसाहेब यांच्या दोन बहिणीचे लग्न झाले होते आणि त्या सासरी होत्या. लग्पापासुन वर्षा ही आरोपींकडे चार महिने नांदली. लग्नानंतर वर्षा ही एक महिन्यांनी तिच्या माहेरी आली त्यावेळी ती दोन-तीन दिवस माहेरी राहिली. त्यावेळी तिला सासरे कसे चालु आहे, असे विचारल्यानंतर तिने सर्व चांगले चालु आहे, असे सांगितले. त्यानंतर वर्षा पंधरा दिवसांनी माहेरी आंबे खाण्यासाठी आली त्यावेळेस ती पाच ते सहा दिवस राहिली व त्यावेळी सासरी कसे चालु आहे, असे विचारल्यानंतर तीने थोडाफार त्रास सुरु आहे, असे सांगितले. त्यानंतर ती सासरी गेली व दिनांक २१.०४.२०१२ पर्यंत तिच्या सासरी राहिली. त्यानंतर वर्षा परत कधीही तिच्या सासरी गेली नाही. वर्षा सासरी असतांना दिनांक १०.०१.२०१२ रोजी साक्षीदार तिला भेटण्यासाठी तिच्या सासरी गेली होती. परंतु, त्यावेळी काय बोलणे झाले होते, हे तिला आठवत नसल्याबाबत साक्षीदाराने कथन केले आहे.

१६. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ व २ यांनी सरतपासाणीत दिलेल्या पुराव्यावरुन त्यांना आरोपींनी प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी रक्कम रुपये पंधरा लाखाची हमागणी केल्याचे नमुद आहे. परंतु, त्यांनी उलटतपासाणी दरम्यान मान्य केल्याप्रमाणे आरोपी यांचे स्वत:चे आर.सी.सी. घर आहे व एक मोटार सायकल आहे तसेच आरोपी क्र.१ हा करमाळा येथे वीज खात्यात ऑपरेटर म्हणुन आहे. अशा परिस्थीतीत त्यांनी तक्रारदार हिच्याकडे पुन्हा अतिरीक्त पैशाची मागणी केली, हे अभियोग पक्षाने आवश्यक व विश्वसनिय पुरावा देवुन सिध्द केलेले

नाही. आरोपींना स्वत:चे घर असतांना प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी पैसे मागण्याची आवश्यकता होती, हे सिध्द होत नाही. सबब, अभियोग पक्षाचा पुरावा विश्वसनिय वाटत नाही व तो आवश्यक इतर तोंडी पुराव्याने परिपोषक झाला नाही.

१७. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ही तक्रारदार हिची आई असुन त्यांनी त्यांच्या सरतपासाणीत अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या पुराव्यानुसार कथन केले आहे. त्यांनी त्यांना अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांना होणा-या त्रासाबाबत त्यांच्याकडुन कळाले, असे कथन केले आहे. यावरुन अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांना त्रास देण्याच्या घटनेच्या वेळी ते प्रत्यक्ष हजर नव्हते व त्यांचा तोंडी पुरावा हा ऐकीव पुरावा असल्याचे स्पष्ट होते. साक्षीदार क्र.१ यांच्या कथनाप्रमाणे आरोपींनी तक्रारदार हिस नांदवण्यासाठी पाठविल्याबाबत नोटीस पाठविल्यानंतर साक्षीदार क्र.२ हे साक्षीदार क्र.१ यांना नांदविण्यासाठी दिनांक ११.०७.२०१२ रोजी सासरी घेवुन गेले असता, आरोपींनी तक्रारदार व तिचे आईस मारहाण केली. परंतु, साक्षीदार क्र.२ यांच्या सरतपासादरम्यान साक्षीदार क्र.२ हिला नांदण्यास घेवुन गेले असता, त्यांना शिवीगाळ व मारहाण केल्याबाबतचे कथन केले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी नांदण्यास गेल्यास तिला व तिच्या आईस शिवीगाळ करुन मारहाण केल्याबाबतच्या कथनास दुजोरा मिळत नाही. त्यामुळे आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केल्याबाबत शंका उत्पन्न होते. साक्षीदार क्र.१ यांच्या कथनानुसार लग्नापासुन आरोपी क्र.१ हे नोकरीनिमित्ताने कोल्हापुर येथे रहात होते तसेच आरोपी क्र.२ हे चुलत सासरे असुन ते तिच्या सास-यापासुन विभक्त राहतात. आरोपी क्र.४ ते ८ हे नंदा व नंदावे असुन त्यांच्या ननंदांचे लग्न तक्रारदार हिच्या लग्नापुर्वी झाले आहे व त्या त्यांच्या सासरी नांदतात, हे मान्य केले आहे. तसेच आरोपींनी अशा परिस्थीतीत आरोपींनी तक्रारदार यांच्याकडे प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी व चारचाकी वाहन घेण्यासाठी रक्कम रुपये पंधरा लाख रुपयांची मागणी केली, ही बाब संशयास्पद वाटत असुन ती सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांचा तोंडी पुरावा दिलेला नाही. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ हे साक्षीदार क्र.१ यांची आई असल्याने ते हिसंबंधीत साक्षीदार आहेत. मात्र फक्त आणि फक्त याच कारणावरुन त्यांना खटल्यातील स्वारस्य असलेले साक्षीदार संबोधणे न्यायोचित होणार नाही. कारण प्रत्येक संबंधित साक्षीदारास स्वारस्य असलेला साक्षीदार म्हणता येणार नाही. खटल्याच्या स्वरुपाचा विचार करता, नैसर्गिकरित्या हार काही बाहेरचे साक्षीदार असणे अपेक्षित नाही. तसेच घटनेच्या स्वरुपाचा आणि आरोपीविरुध्दच्या आरोपांचा विचार करता शेजारी राहणारे लोक

देखील साक्षीदार असू शकतात. मात्र तपासिक अंमलदार यांनी तपास करतांना त्याबाबतची फार काही तसदी घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे फक्त तपासिक अंमलदार यांनी योग्य ती तसदी न घेतल्यामुळे अभियोगपक्षाचे वतीने तपासण्यात आलेले साक्षीदारावर अविश्वास ठेवणे न्यायोचित होणार नाही. परंतु, त्यांचा तोंडी पुरावा इतर कागदोपत्री पुराव्याने परिपोषक न झाल्याने ते विश्वसनिय साक्षीदार आहे, असे अनुमान काढता येणार नाहीत.

१८. तक्रारदार यांनी निशाणी क्र.५६ कडील पहिली खबर ही जवळजवळ सहा महिन्यानंतर नोंदविलेली आहे. सदर झालेला विलंब त्यांनी योग्य स्पष्टीकरण देवुन स्पष्ट केलेला नाही. त्यांच्या पुराव्यामध्ये ते केवळ आरोपी यांची समजुत घालत होते, असे कथन केले आहे. परंतु, सदरचा विलंब कोणत्याही इतर तोंडी पुराव्याशिवाय समाधानकारक व विश्वसनिय नाही, असे अनुमान काढण्यात येतात.

१९. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ हे तपासी अधिकारी असुन त्यांच्या पुराव्याप्रमाणे सन २०१०-२०१५ या कालावधीमध्ये केज पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर ते कार्यरत होते. गुन्हा क्र.२०९/२०१२ हा पोलीस नाईक अनवणे यांनी नोंदविला व तपास त्यांचेकडे देण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी सर्व आवश्यक कागदपत्रे हस्तगत करुन साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. त्यांनी आरोपींचे अटक फॉर्म निशाणी क्र.२२७ ते २३४ प्रमाणे शाबीत केले आहेत. तपासादरम्यान आरोपींनी तक्रारदारास तु चांगली दिवस नाहीस प्लॉट व चारचाकी गाडी घेण्यासाठी माहेरहुन पंधरा लाख रुपये घेवुन ये, असे म्हणुन पैशाची मागणी केली व तिला मारहाण करुन शिवीगाळ केली व घरातुन हाकलुन दिल्याचे निष्पन्न झाल्यावरुन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केल्याबाबत, कथन केले आहे. सदर साक्षीदाराच्या उलटतपासादरम्यान तक्रारदार हिने महिला तक्रार निवारण केंद्राबाबत सांगितल्याचे आठवत नसल्याबाबत तसेच तक्रारदार यांनी महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये केलेल्या तक्रारीबाबत पुढे काय झाले याबाबत चौकशी केली नसल्याबाबतचे, कथन केले आहे. त्यामुळे तक्रारदार यांनी महिला तक्रार निवारण केंद्रामध्ये तक्रार दाखल केल्याबाबतचे कथन सिध्द झाले नाही. पुढे त्यांनी घटनास्थळाच्या शेजारी ठिकाणहुन साक्षीदार मिळुन आले नसल्याने साक्षीदारांचे टिपण नोंदविले नसल्याचे, कथन केले आहे. साक्षीदारांच्या पुराव्यादरम्यान पटलावर आलेल्या सुधारणा तपासिक अंमलदार यांच्या पुराव्यातुन शाबीत झालेल्या नाहीत.

२०. अभियोग पक्षाने पहिली खबर नोंदवण्यास झालेला विलंब योग्य ते स्पष्टीकरण देवुन स्पष्ट न केल्याने त्याअधारे पहिली खबरच्या सत्यलेखणाबाबत संशय निर्माण होत आहे. तसेच तक्रारदार यांच्या कथनानुसार आरोपींनी यांनी तक्रारदार यांना लग्नानंतर चार महिने व्यवसिथत नांदवले. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता तसेच तक्रारदार यांच्या फिर्यादीनुसार तक्रारदार यांचे लग्न दिनांक १८.१२.२०११ रोजी झाले असून त्यांना दिनांक २६.०३.२०१२ रोजी घरातून हाकलून दिले. तक्रारदार व साक्षीदार यांच्या सरतपासादरम्यान तक्रारदार यांना दिनांक २६.०४.२०१२ रोजी मारहाण करुन घरातून हाकलून दिले असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे तक्रारदार यांना घरातून हाकलून दिलेल्या तारखाबाबत फिर्याद व साक्षीदारांचा तोंडी पुरावा यामध्ये सुसंगतता असल्याचे दिसून येत नाही. तसेच तक्रारदार एका बाजूला असे कथन करते की, आरोपींनी लग्नानंतर चार महिने तिला व्यवथस्थित नांदवले व दुस-या बाजूला असे कथन करते की, आरोपीनी त्याकाळामध्ये तिला वेगवेगळया कारणवरुन मानसिक त्रास दिला व तिला उपाशी ठेवून व मारहाण करुन घरातून हाकलून दिले. तक्रारदार यांच्या कथनामध्ये विरोधाभास असल्याचे दिसून येते. त्यामुळे तिच्या वर्तणूकीवरुन आरोपींनी त्यांना त्रास दिल्याचे शाबीत झाले नसल्याबाबतचे अनुमान काढण्यात येतात.

२१. अभियोग पक्षाने तक्रारदार हिला आरोपीने क्रुर वागणुक दिली याकरीता इतर स्वतंत्र व ति-हाईत साक्षीदार यांचा तोंडी पुरावा दिलेला नाही. सबब, अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ व २ हे हितसंबंधी साक्षीदार असल्याने व त्यांचा तोंडी पुरावा इतर कोणत्याही पुराव्याने परिपोषक न झाल्याने ते विश्वसनिय साक्षीदार नाहीत, असे अनुमान काढण्यात आले.

२२. तक्रारदार हिने तिचा लेखी युक्तीवाद निशाणी क्र.२५३ येथे दाखल केला असुन तिने तिच्या पुराव्याप्रमाणे व फिर्यादीप्रमाणे कथन केले आहे. फिर्यादीच्या कथनांनुसार तिला सासरच्या लोकांनी जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. फिर्यादीने तिला मारहाण केलेबाबतची एन.सी.ची छायांकित प्रत दाखल केली असुन त्यावरुन दिनांक ११.०७.२०१२ रोजी तक्रारदार हिने भिमराव, अंतरकला, रावसाहेब व दादाहारी यांनी मारहाण केल्याबाबत नमुद आहे. पुढे तक्रारदार यांनी दाखल केलेल्या युक्तीवादाप्रमाणे आरोपी क्र.१ याने कल्पना लाटे हिच्याशी दुसरा विवाह केला असुन त्यामधुन त्यांना एक मुलगी आहे हे दर्शविण्यासाठी तिने प्रिया लाटे हिच्या शाळेचा प्रवेश दाखला, शाळेच्या प्राचार्य यांना कल्पना लाटे यांनी लिहिलेले पत्राच्या छायांकित प्रति दाखल केल्या आहेत.

परंतु, यावरुन आरापी क्र.१ याने कल्पना लाटे यांच्यासोबत दुसरा विवाह केल्याचे निष्पन्न होत नाही. तथापी तक्रारदार यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कोठेही आरोपी क्र.१ याने दुसरा विवाह केल्याबाबतचे कथन केलेले नाही. तथापी, दुसरा विवाह कधी केला, कोणासोबत केला, याचा देखील उल्लेख पुराव्यादरम्यान कोठेही आलेला नाही. तक्रारदार यांनी एच.एम.पी. क्र.१६/२०२६ मधील अंतरकला धस हिचे पुराव्याचे शपथपत्र तसेच उलटतपास दाखल केला आहे. परंतु, यावरुन आरोपी क्र.१ यांनी दुसरा विवाह केल्याचे व आरोपींनी पैशाच्या मागणीकरीता तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे सिध्द होत नाही. तसेच तक्रारदार यांनी दाखल केलेल्या दिनांक ३१.०८.२०१४ रोजीच्या जबाबाच्या प्रतिवरुन सदरचा जबाब हा सदरचा खटला दाखल झाल्यानंतरच्या तारखेचा असल्याचे दिसुन येते.

२३. दोन्ही बाजुच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तिवादाच्या प्रकाशात अभियोगपक्षाच्या वतीने सादर करण्यात आलेला वर नमुद पुरावा काळजीपुर्वक रित्या आरोपीतांविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपातील मुख्य कलमाच्या म्हणजेच ***भारतीय दंड विधान, कलम ४९८अ*** च्या घटकांच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते. सदर कलम खालीलप्रमाणे आहे.

> **४९८अ.** एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला क्रुर वागणुक देणे - जो कोणी एखाद्या स्त्रीचा पती असुन किंवा पतीचा नातेवाईक असुन, अशा स्त्रीला क्रुर वागणुक देईल त्याला, तीन वर्षेपर्यंत असु शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.
>
> स्प्ष्टीकरण - या कलमाच्या प्रयोजनार्थ “क्रुर वागणुक देणे” याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे-
>
> (अ) ज्यामुळे त्या स्त्रीला आत्महत्या करणे क्रमप्राप्त होईल अथवा तिला दुखापत होईल अथवा तिच्या जिवीताला, अंगाला किंवा स्वास्थ्याला (मानसिक किंवा शारिरीक) धोका निर्माण होईल अशा त-हेचे कोणतेही बुध्दीपुरस्पर वर्तन;
>
> (ब) जेव्हा त्या स्त्रीवर किंवा तिच्याशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर कोणत्याही मालमत्तेची किंवा मुल्यवान रोख्याची बेकायदेशीर मागणी पुर्ण करण्याची जबरदस्ती करण्याच्या हेतुने अथवा अशी मागणी पुर्ण करण्यात तिच्याकडुन किंवा तिच्याशी संबंधीत असलेल्या व्यक्तीकडुन कसुन झाल्याबद्दल तिला सतवले जाते तेव्हा, अशी सतवणुक

२४. प्रस्तुत खटल्यातील आरोपीतांविरुध्द ठेवण्यात आलेला मुख्य दोषारोपानुषंगे म्हणजेच भारतीय दंड विधान, कलम ४९८अ बाबतचा अभिलेखावरील पुरावा हा पुर्णतः त्रोटक स्वरुपाचा आहे. तसेच उर्वरीत दोषारोपानुषंगेचा म्हणजेच भारतीय दंड विधान, कलम ३२३, ५०४, ५०६

बाबतचा संशयापलीकडे जाऊन ते सिध्द करणारा पुरावा अभिलेखावर नाही. अशा परिस्थितीत वरनमुद सर्व कारणांचा आणि अभिलेखावरील खटल्याच्या मुळाशी जाणा-या पुराव्यातील तफावतींचा विचार करता, प्रस्तुत खटल्याकामी आरोपीतांना वरनमुद मोघम, अस्पष्ट अशा पुराव्याधारे दोषी धरता येणार नाही. एकुणच वरनमुद कारणांमुळे अभियोगपक्षाच्या खटल्याच्या सत्यतेवर संशय निर्माण होत असुन, आरोपीतांविरुध्द सबळ पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असुन, मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१, ३ ते ८ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, कलम ४९८-अ, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वयेच्या दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीतांचा पूर्वीचा जामिन व जातमुचलका रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीतांना फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रुपये ५,०००/- चा जामिन व जातमुचलका सादर करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३६५ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिवाडयाची एक सत्यप्रत मा. जिल्हादंडाधिकारी, बीड यांना पाठविण्यात यावी.

५. मा. जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी न्यायनिवाडयाची सत्यप्रत खबरी नामे वर्षा रावसाहेब धस, राहणार सांगवी ह.मु. औरंगाबाद यांना पोहोच करुन, त्याबाबतची पोहोच या न्यायालयाच्या अभिलेखाकामी पाठवावी.

६. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.05.11 17:14:14 +0530

स्थळ :- केज.
दिनांक :- ११.०५.२०२६.

(पी.व्ही.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
केज.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Dictated on | : 11.05.2026 |
| Transcribed on | : 11.05.2026 |
| Checked & signed on | : 11.05.2026 |

Sd/-
V.A. Kulkarni,
Junior Clerk,
2nd Jt. CJJD and JMFC, Court Kaij.